**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (Old)**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पाठ्यपुस्तकाच्या आधारे निबंध लिहा :

(1) पंचविशीचे वैभव.

(2) दलित वाङ्मयाची चळवळ

(3) सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य

(4) विज्ञान एक वरदान. 20

2. 'अक्षरांचे आभाळ' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

'गुलाम' या कवितेचे रसग्रहण करा. 20

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **शंभर** शब्दांत लिहा :

**गट 'अ'**

(क) ''विज्ञानाने धर्मभावनेला धक्का दिला'' असे द.के. केळकर का म्हणतात ?

(ख) दलित लेखकांची जाणीव अन्यवर्गीय लेखकांच्या जाणीवेपेक्षा निराळी कशी ठरते ?

(ग) 'नकार टाळी' चे स्वरूप विशद करा.

(घ) 'कार्ट्या ! अजून कसे तुला जगातले ज्ञान नाही ?' या नाट्यछटेचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

**गट 'आ'**

(च) विज्ञानवेत्या राष्ट्रांपुढे कोणता जटील प्रश्न उपस्थित झाला आहे ?

(छ) वसंत सबनीसांनी टाळी घेण्यापेक्षा टाळी देणे अधिक महत्त्वाचे का मानले ?

(ज) डॉ. लिमये लष्करात का गेले नाहीत ?

(झ) साखराबयचे बोरबन बंदिस्त का झाले ? 20

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे **शंभर** शब्दांत लिहा :

**गट 'क'**

(त) ''ध्येयवादी विभूतीचे कार्य अविनाशी असते'' हे विधान स्पष्ट करा.

(थ) अनंत फंदी यांनी संसारी माणसांना कोणता उपदेश केला आहे ?

(द) निमंत्रण पत्रिकेचे स्वरूप कसे असावे ते सांगा.

(ध) इतिवृत्त लेखनाच्या पद्धतीचे वर्णन करा.

**किंवा**

**गट 'ख'**

(प) विज्ञानाच्या उपासनेचा नेमका कोणता अर्थ द.के. केळकर यांना अभिप्रेत आहे ?

(फ) 'स्त्री जन्म एक जुलूम आहे' असे कवयित्री का म्हणतात ?

(ब) टिप्पणीचे प्रकार सांगून माहिती पर टिप्पणीचे स्वरूप सांगा.

(भ) इतिवृत्त लिहिताना कोणती काळजी घ्यायची असते ? 20

5. पुढील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

(1) "पंचविशीतील तरूणांचे अविचार चालू आहेत म्हणूनच जगाची प्रगती चालू आहे" असे लेखक का म्हणतात ?

(2) 'अक्षरांचे आभाळ' कवितेतून दलितांना आलेल्या स्वत्वभानाचा परिचय घडवा.

(3) सहकारी सुतगिरणीतील लिपीकाच्या पदाकरिता अर्ज तयार करा.

(4) जाहिरातीतील मथळयाचे महत्व स्पष्ट करा. 20